# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेसनोट क्रमांक ३१२/२०२४** **दिनांक- १९/०८/२०२४.**

## "अनाधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या ०३ महिला बांगलादेशी नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई"

दिनांक १७.०८.२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना त्यांच्या बातमीदारामार्फत न्यु मिरा पॅराडाईस बिल्डींगचे पाठीमागील झोपडपट्टी, गितानगर, नयानगर मिरारोड पुर्व या ठिकाणी बांगलादेशी नागरीक विनापरवाना राहत आहेत. तसेच जैन मंदीर, अंबर स्विट मार्ट जवळ मिरारोड पुर्व या ठिकाणी बांगलादेशी नागरीक कामासाठी येतात अशी माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह वरील नमुद ठिकाणी साफळा रचुन ११.४० वा. ते १२.१० वा. दरम्यान साफळा रचुन ०३ बांगलादेशी महिलांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपुस करुन त्यांनी ते बांगलादेशी नागरीक असल्याचे कबुली दिल्याने त्यांना ताब्यात घेवून सदर बाबत दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा केला असून सरकार तर्फे मपोशि/१३०७६ अश्विनी शहाजी भिलारे यांनी दिलेल्या फिर्यादवरुन नयानगर पोलीस ठाणे गुन्हा क्र.३५४/२०२४, पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३, ४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७,१३,१४-अ (ब) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाचे पोनि समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, रामचंद्र पाटील, शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/केशव शिंदे, पोशि/चेतनसिंग राजपुत मपोशि/अश्विनी भिलारे, मपोशि/शितल जाधव, चा.पोहवा/सम्राट गावडे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

**-------------0000-------------**